D-28/2/2020

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत १० वा मजला, शासकीय वसाहत,बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
दूरध्वनी क्रमांक -२६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल : collectormsd@gmail.com

क्र.:कार्या-२आय/टे-८/कावि-को.स.कां.त/१८
दिनांक : 11 /०२/२०२० 2254

प्रति,
मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग,
कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

विषय : कांदळवनाच्या ऱ्हासाबाबतच्या तक्रारीच्या पूर्तता अहवाल...
Destruction of Mangroves at Pahadi Goregaon, S.No. 161, CTS No. 1

संदर्भ : १. मा. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील दि. २३/११/२०१८ रोजीच्या पत्रासोबत श्रीम. श्वेता भट्ट यांची तक्रार.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल दिनांक ०७/०२/२०२०.

Steno. Mangrove committee

सदर प्रकरणी श्रीम. श्वेता भट्ट यांची कांदळवन ऱ्हासाबाबतची तक्रार (आपल्याकडील संदर्भीय यादीतील अ.क्र. २५ नमूद कांदळवन अहवाल क्र. १५९/६) या कार्यालयास प्राप्त झाली आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर तक्रारीबाबत चौकशी केली असून त्याबाबतचा विहीत नमुन्यातील अहवाल खालीप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा विषय | कार्यवाहीचा तपशिल. |
|---|---|---|
| 1 | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्रीमती. श्वेता भट्ट दि. 23/11/2018 |
| 2 | तक्रारीचा विषय | Destruction of Mangroves at Pahadi Goregaon, S.No. 161, CTS No. 1 |
| 3 | तक्रारीशी संबंधीत जागेचा तपशिल उदा. स.नं., गावाचे नांव, तालुका. | मौजे-पहाडी गोरेगांव, तालुका बोरीवली येथील स.नं. 161, न.भू.क्र. 1 |
| 4 | चौकशी करणा-या अधिका-याचे नांव व पद्नाम. | श्री. संतोष लोहकरे, मंडळ अधिकारी गोरेगांव |
| 5 | चौकशीमध्ये आढळून आलेली परिस्थिती. | सदर प्रकरणी उपरोक्त नमूद अधिकारी यांनी स्थळपाहणी केली आहे. त्यानूसार मौजे-पहाडी गोरेगांव, ता. बोरीवली येथील स.नं. 161, न.भू.क्र. 1 ही मिळकत खाजगी मिळकत आहे. सदर मिळकतीच्या बाजूने अंदाजे 2 कि.मी. अंतरावर रस्त्याकरीता जुनी भरणी केलेली दिसून आली. काही भागावर दोन पक्क्या स्वरूपाची जुनी बांधकामे आहेत. रस्त्याकरीता केलेल्या भरणीला लागून कांदळवनाची झाडे असल्याचे दिसून आले. सदर मिळकतीवर बिलाईन्स इन्फेक्स प्रा.लि. पर्ल कॉस्केम प्रा. लि. यांचे फलक लागलेले आहेत. तसेच |

DCF(M)

Surveyor

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक - 4380
दिनांक - 26/2/2020
मुख्य लेखापाल | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
28/2

| | | |
|---|---|---|
| | | गेटलगत वॉचमन कॅबिन व कच्या पत्र्याचे शेड आहे.<br>तसेच सदर जागेमध्ये रिलायन्स कंपनीचे तीन टॉवर असून, उर्वरीत मोकळ्या जागेवर गवत व रानटी झाडे झुडपे असल्याचे दिसून आले. आज रोजी कांदळवनचा -हास झाल्याचे दिसून आले नाही.<br>तसेच जुन्या भरणीबाबत ओशिवरा पोलीस ठाणे येथे जमीन मालक मे. उषा मधू डेव्ह. को.ऑ.हौ.सो. यांचेवर गु.क्र. 53/17 दि. 17/4/2017 रोजी गुन्हा दाखल केला आहे. |
| 6 | कांदळवनाचा -हास झाला आहे किंवा नाही. | प्रकरणी जमीन वन विभागाकडे हस्तांतरीत केलेली असल्यामुळे सदर जागेवर रस्त्याच्याकडेला रॅबीटच्या गोणी टाकल्याच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष यांना वारंवार दाखल करणेबाबत कळविणेत आलेले आहे. सदर ठिकाणी वन विभागामार्फत निष्कासन प्रस्तावित आहे. |
| 7 | कांदळवनाचा -हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधीत पोलीस स्थानकाचे नांव | - |
| 8 | कांदळवनाचा -हास झाला असल्यास, ज्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता. | - |
| 9 | कोणत्या कायद्याअंतर्गत / कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन. | - |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा, उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल व अनुषंगीक कागदपत्रे पृष्ठ क्र. ०१ ते ०५ पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर केलेली आहेत.

( वंदना मकू )
**अपर चिटणीस, मुंबई उपनगर**

**स्थळ प्रतिवर मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांची सही असे.**

**प्रत : मा.** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई, 302, वेक फिल्ड हाऊस, 3रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट, मुंबई- 01 यांना माहितीस्तव.